आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार, दिनांक १४ मे २०२४

ठळक बातम्या

1. मुंबईच्या घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेत १४ जण मृत्यमुखी, ४२ जणांवर उपचार, बचाव आणि शोध कार्य अद्यापही सुरु.

2. लोकसभा निवडणूकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस - भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसीमधून भरला उमेदवारी अर्ज.

3. भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपी गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयातर्फे सशर्त जामीन मंजूर.

4. नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा परिचय नि:शुल्क उन्हाळी शिबीराला उद्या पासून सुरवात.

*****

घाटकोपर दुर्घटना

घाटकोपरच्या छेडा नगर इथं काल वादळी वाऱ्यामुळं महाकाय लोखंडी जाहिरात फलक हा पेट्रोल पंपावर कोसळल्यामुळं झालेल्या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला आहे. रुग्णालयात ४२ जण दाखल झाले असून त्यातील एक जण गंभीर आहे. ३२ जणांवर उपचार करून त्यांना रुग्णालयातून सोडण्यात आलं आहे. या दुर्घटनेत १०० पेक्षा जास्त जण अडकल्याची शक्यता महानगरपालिकेच्या आपत्कालीन विभागानं वर्तवली आहे. 'दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक आणि अग्निशमन दलाचं शोध कार्य सुरू आहे. 'होर्डिंगचे मालक भावेश भिडे आणि इतरांवर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपीला अटक करण्यात आली नसून त्याचा शोध सुरू आहे,' अशी माहिती पंत नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश केवळे यांनी आकाशवाणीला दिली. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल अपघातस्थळी भेट दिली. अपघातातल्या मृतांच्या कुटुंबियांना त्यांनी ५ लाख रुपये मदत जाहीर केली असून जखमींच्या उपचारांचा खर्च राज्य सरकार उचलणार असल्याचं ते यावेळी म्हणाले.

## उमेदवारी अर्ज

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठी अर्ज करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या सत्तावन्न लोकसभा जागांसाठी येत्या एक जूनला मतदान होणार आहे. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघातून अर्ज भरण्याची मोदी यांची ही सलग तिसरी वेळ आहे. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

## पाचवा टप्पा

येत्या वीस तारखेला मतदान होणार असलेल्या निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचारानं वेग घेतला असून सगळया पक्षांचे दिग्गज नेते प्रचार सभा आणि प्रचार फे-या याद्वारे मतदारांशी संवाद साधत आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या नाशिक जिल्ह्यातल्या निफाड तालुक्यात पिंपळगाव बसवंत इथे जाहीर सभा घेणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार हे सुद्धा येत्या दोन दिवसात नाशिक जिल्ह्यात जाहीर सभा घेणार आहेत. नाशिकमध्ये महायुतीच्या प्रचारासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, पंकजा मुंडे यांच्या सभांचं तर महाविकास आघाडीच्या प्रचारासाठी खासदार अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार इम्रान प्रताप गडी यांच्या सभांचं नियोजन केलं जात असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

## निवडणूक पुढे ढकलली

विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या प्रत्येकी २ जागांसाठी होऊ घातलेल्या २ निवडणूका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. शाळांच्या उन्हाळी सुट्ट्या संपल्यावर निवडणूक घ्यावी अशी मागणी करणारं पत्र आयोगाला प्राप्त झाल्या नंतर आयोगातर्फे निवडणूक पुढे ढकलत असल्याचं निवेदन जारी करण्यात आलं आहे.

## छत्रपती संभाजी महाराज जयंती

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या औचित्यानं त्यांना आज अभिवादन करण्यात येत आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवनात महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, महापराक्रमी धर्मवीर स्वराज्यरक्षक शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज यांना जयंती दिनी मानाचा मुजरा, अशा शब्दात आदरांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका ट्विट संदेशातून छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहिली असून, मुघल साम्राज्याला हादरवून सोडणारे धुरंदर राजकारणी, प्रकांड पंडित, कुशल संघटक, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन आणि मानाचा मुजरा, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही, परम प्रतापी शंभूराजे यांना जयंतीदिनी त्रिवार मानाचा मुजरा, अशा शब्दात आदरांजली वाहिली आहे. स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती आज नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात देखील साजरी करण्यात आली. आयुक्तालयातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त प्रदीप कुलकर्णी यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. त्याचप्रमाणे महावितरणच्या काटोल मार्गावरील 'विद्युत भवन' इथं देखील छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

## लोकनिर्णय महाराष्ट्र

श्रोतेहो,'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात मुंबई ईशान्य लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

## भीमा कोरेगाव

भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपी गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयान जामीन मंजूर केला आहे. नवलखा चार वर्षांपासून कोठडीत आहे. या प्रकरणी अद्याप आरोप निश्चित करण्यात आलेले नाहीत. सहा सहआरोपींना यापूर्वीच जामीन मिळाला आहे. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयान नवलखा यांच्या जामीनाला घातलेली स्थगिती वाढवण्याच कोणतही कारण नसल्याचं दिसतं, असं न्यायालयानं नमूद केलं. गौतम नवलखा यांना त्यांच्या घरीच झालेल्या नजरकैदेच्या सुरक्षेसाठीचा वीस लाख रुपयांचा खर्च भरण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

उन्हाळी शिबीर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुढाकारानं तरंग फाऊंडेशनच्या वतीनं क्रीडा परिचय नि:शुल्क उन्हाळी शिबीराचं आयोजन उद्या पासून २५ मे पर्यंत रवीनगर येथील विद्यापीठाच्या क्रीडा संकुल इथं करण्यात आलं आहे. सायंकाळी साडे पाच ते साडे सात पर्यंत चालणाऱ्या या शिबीरात **ॲ**थलेटिक्स, बॅडमिंटन, योगासनं, मार्शल आर्ट, जिम्नॅस्टिक, बास्केटबॉल, टेबलटेनिस या खेळाच प्रशिक्षण नवोदित आणि इतर खेळाडूंना मिळणार आहे. यात ५ ते १५ वर्षे वयोगटातील खेळाडूंना सहभागी होता येणार आहे. इच्छुक विद्यार्थी शिक्षण विभागात रेणूका भोयर यांच्याशी ७२७६४२२२८८ या क्रमांकावर संपर्क साधू शकतील. या शिबीरात मोठ्या संख्येनं खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

विशेष व्याख्यान, नागपूर विद्यापीठ

साहित्य क्रांती करीत नाही. मात्र, क्रांतीसाठी पार्श्वभूमी नक्कीच तयार करते. साहित्य सामाजिक परिवर्तनाचा आधार देखील असल्याच प्रतिपादन साहित्य अमृतचे संपादक आणि दिल्ली आकाशवाणीचे माजी उपमहानिदेशक लक्ष्मी शंकर वाजपेयी यांनी केलं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागातील भाषा भवन इथं नुकत्याच पार पडलेल्या विशेष व्याख्यानात वाजपेयी मार्गदर्शन करीत होते. यावेळी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी आणि हिंदी विभाग प्रमुख डॉ.मनोज पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठाच्या २०२२-२३ या शैक्षणिक सत्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा विभागाच्या परीक्षेत सुवर्णपदक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात अमरावती येथील प्रा. नरेंद्र राऊत यांचा देखील सत्कार करण्यात आला.

ग्रीन नेट

नागपूर मध्ये उन्हाचा तडाखा जाणवत असून, नागरिकांचा उन्हापासून बचाव व्हावा त्याकरीता नागपूर महानगर पालिकेने लोकांच्या सोयीसाठी सिव्हील लाईन परिसरातील जीपीओ चौकात हिरव्या जाळया लावल्या आहेत. यामुळे काही प्रमाणात उन्हापासून नागरिकांच संरक्षण होत आहे. आता शहरातील प्रतेक सिग्नलवर असे ग्रीन नेट बांधण्यात यावे अशी मागणी सामान्य नागरिकांकडून होत आहे असे आमच्या प्रतिनिधीने कळवले आहे.

## <u>हवामान</u>

विदर्भामध्ये नागपुर, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम या जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येल्लो अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय उद्या वाशीम, यवतमाळ आणि गडचिरोली मध्ये अश्याच प्रकारचा येलो अलर्ट असेल. दरम्यान, उर्वरित आठवड्यात हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज आहे. गेल्या २४ तासात विदर्भात सर्वाधिक तापमान अकोला -जिल्ह्यात ४१ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं. येत्या ३-४ तासात विदर्भातील नागपूर वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## <u>वाघ हल्ला</u>

तेंदुपत्ता संकलन करीत असताना दबा धरून बसलेल्या वाघान हल्ला केल्यामुळे पार्वता बालाजी पाल, वय ६४ वर्षे, या महिलेचा मृत्यू झाला आहे. सदर घटना ही गडचिरोली मुख्यालयापासून फक्त दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या आंबेशिवणी जवळील बामणी बीट क्रमांक ४११ मधील आहे.

## <u>शैक्षणिक दाखले</u>

सीबीएसई बोर्डाचा इयत्ता 10 वी आणि 12 वीचा निकाल नुकताच लागला आहे. जून महिन्यात स्टेट बोर्डाचा निकाल लागणार असून पुढील शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विविध प्रकारच्या दाखल्यांची आवश्यकता पडणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, भूमीहिन प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र अशा विविध प्रकारच्या दाखल्यांची आवश्यकता असते.त्यामुळे शैक्षणिक कामाकरीता लागणारे आवश्यक दाखले वेळेपूर्वीच काढून घ्यावे, असे आवाहन चंद्रपूर जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

*****